
बर्फी ?
गणेश विमल महादू सानप

# बर्फी?

## लेखक : गणेश विमल महादू सानप

ई साहित्य प्रतिष्ठान

# बर्फी?

**लेखक**

गणेश विमल महादू सानप

मु. कऱ्हे पो. निमोण ता. संगमनेर जि. अ. नगर ४२२६११

९५९४६०७३९२

ganeshsanap1987@gmail.com

aadarsha.blogspot.com

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ ब वर्ग (लेखक) सभासद क्र. ३७०९०

**प्रकाशक :-**

इ-साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २० डिसेंबर २०१९

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

**यापूर्वी :-**

- वृत्तपत्रांमधून लेख
- ब्लॉग aadarsha.blogspot.com
- फीदंरी (चित्रपट कथा-पटकथा)
- जगायचं कुणासाठी? (शेतकरी आत्महत्येवर पुस्तक)
- जगायचं कुणासाठी? (लघुपट)
- Independence Day After Long Time (लघुपट)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनरमुद्रण, नाट्य, चित्रपट अथवा इतर ठिकाणी रूपांतरित करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

या कथेतील सर्व स्थळ, पात्र, आणि प्रसंग काल्पनिक आहेत. या कथेचा आणि पात्रांचा कुठल्याही घटनेशी संबंध आला तर तो निव्वळ योगा योग समजावा.

इ-साहित्य आणि सर्व टीमचे मनापासून खूप-खूप धन्यवाद तुमच्या मुळे मला लिहिण्यसाठी प्रोत्साहन मिळालं.



**नमस्कार,**

माझा परिचय मी याआधी दिलाच आहे, त्यामुळे मी पुन्हा तुमचा वेळ घेत नाही. आजूबाजूला घडणाऱ्या कौटुंबिक, सामाजिक, आणि राजकीय घडामोडींचा परिणाम हा सर्वांच्याच जिवणार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष होत असतो. तसाच तो माझ्यावर हि होतो. यातील काही घटना किंवा चालीरीती मला खटकतात आणि त्यातूनच मी व्यक्त होण्याचा प्रयत्न करत असतो. जगायचं कुणासाठी? या पुस्तकाबद्दल अनेकांनी शुभेच्छा दिल्या त्याबद्दल सर्वांचे मनापासून धन्यवाद! अमूल्य वेळ काढून पुस्तक वाचलंत, या पुढेहि तुमच्या शुभेच्छा आणि आशीर्वाद असेच रहावेत हीच इच्छा.

पुस्तक वाचून आवडल तर नक्की सांगा, त्याच बरोबर काही सूचना असतील तर त्याही सांगा.

**धन्यवाद,**

**गणेश विमल महादू सानप**

## पुस्तकाबद्दल थोडक्यात

पहिला मुलगा झाला तर आनंद गगनात न मावणारे लोक मी पाहिलेत, म्हणून दुसरं अपत्य हौस म्हणून मुलगी असावी अश्या विचारांचे लोक मी पाहिलेत. पहिली मुलगी झाल्यानंतर नाराज होणारे मी पाहिलेत, म्हणून दुसरं अपत्य वंशाला एक तरी दिवा असावा त्यासाठी गैरमार्ग अवलंबणारे किंवा देवाला नवस करणारे लोक मी पाहिलेत. आज आपल्याकडे दोनच अपत्यांना मान्यता आहे. म्हणून ज्यांना पहिली दोन्ही अपत्ये मुलंच होतात तेव्हा राजीखुशीने नियम पाळणारे मी पाहिलेत. पण ज्यांना पहिले दोन्ही अपत्ये मुलीचं होतात तेव्हा हा नियम मोडणारे मी पाहिलेत. पहिल्या दोन-तीन मुली आहेत पण मुलासाठी वाट बघणारे लोक मी पाहिलेत. पुन्हा मुलगीच झाली म्हणून बाळंतणीला एकटं हॉस्पिटलला सोडून जाणारे लोक मी पाहिलेत. मुलगा होत नाही म्हणून एका स्त्रीला त्रास देणारे किंवा वेळ आल्यावर फारकत घेणारे लोक मी पाहिलेत. आजही अशी परिस्थिती पाहायला मिळते. मला या गोष्टी खूप खटकतात, स्त्री-पुरुष-तृतीयपंथी हे लोक लिंग सोडल तर माणसंच आहेत. मग पुरुषांचच वर्चस्व का? आजही मुलीच्या जन्माचं स्वागत हवं तसं नक्कीच होत नाही.

आज मुली मुलांच्या खांद्याला खांदा लावून अनेक क्षेत्रात उतरल्या आहेत. तीही माणूस आहे म्हणूनच ना.

## खालील गोष्टी घडू नये म्हणून मी काय करू शकतो?

काही चौकटी आपण आखल्या आहेत. मुलाच वय जसं-जसं वाढत जात तसं-तसं त्याला स्वतंत्र बहाल केलं जातं, याउलट मुलीच वय जसं-जसं वाढत जात तसं-तसं तिला बंधनं घातली जातात. आजचं कुठलंही वर्तमान पत्र वाचलं तर मला हि काळजी वाटते माझ्या मुलींची, आम्ही कामावर असतो. काय माहित माझ्या बिल्डिंग मधला वॉचमन मुलीशी अश्लील चाळे करेल, शाळेत असतांना एखादा कर्मचारी वाईट नजरेने बघेल, कि घरी येतांना एखादा मुलगा माझ्या मुलीच्या अश्लील खोड्या करेल. सर्वसामान्य माणूस असल्यामुळे आम्ही ह्या गोष्टी सहनही करू. कारण कुणाकुणाला तोंड देणार, पण उद्या आमच्या गप्प राहिल्याचा फायदा घेऊन अत्याचार घडलाच. तर आमची मुलीची बाजू आहे म्हणून हे सहन हि करू माझ्या मुलीलाही आई वडिलांच्या इज्जतीची काळजी म्हणून तीही हा प्रकार सहन करेल. नाहीच सहन झाला तर आत्महत्या करेल. आणि जर तोंड उघडलंच तर काय माहित ज्याच्यावर सुरक्षेची जबाबदारी आहे तोच उद्या तिच्याकडे शरीरसुखाची मागणी करेल.

## काही घटना बघून खूप विचार पडतो कि, कुठल्या जन्माचं पाप भोगतेय ती.












## श्रीरामपूरमध्ये स्त्री जातीचे अर्भक आढळल्याने खळबळ

May 1, 2019   C News Marathi   01 may 2019, 01052019, shrirampur breaking news



## स्त्री जातीचे अर्भक महिलांच्या शौचालयात, नदीकाठी, मंदिराजवळ



पार्सल देणाऱ्यानं घरात घुसून केला 9 वर्षाच्या मुलीवर बलात्कार



# बहिणीला ठार मारण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीवर बलात्कार

*Aug 11, 2018*

## नराधम सावत्र बापाचा अल्पवयीन मुलीवर १० वर्ष अत्याचार

६ वर्षाच्या मुलीवर बलात्कार करुन हत्या, दोन अल्पवयीन भावांचं घृणास्पद कृत्य

# पुण्यात अल्पवयीन मुलीवर बलात्कार

पुण्याच्या वारजे माळवाडीमधल्या गोकूळनगर परिसरात एका अकरा वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली आहे.

**नागपूर:** पिता आणि पुत्रीच्या पवित्र नात्याला काळिमा फासणारा संतापजनक प्रकार नागपुरात समोर आला आहे. जन्मदात्या पित्याने पोटच्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची घृणास्पद घटना पाचपावली हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी तडकाफडकी कारवाई करीत नराधम पित्याला अटक केली आहे. पीडित मुलीला आईवडिल आणि लहान भाऊ आहे. मुलगी ही आठव्या वर्गात शिकते. मुलीचे वडील सोनपापडीच्या कारखान्यात कामाला आहे. तर आई किराना दुकानात कामाला जाते. दुपारच्या वेळी मुलीचा बाप जेवण करण्यासाठी घरी येत होता त्यावेळी तो तिच्यावर बलात्कार करीत होता. मागील सहा महिन्यांपासून हा प्रकार सुरू होता. यापूर्वीच मुलीने ही माहिती आपल्या शिक्षिकेला दिली होती. शिक्षिकेने मुलीच्या आईला शाळेत बोलावून या घटनेची माहिती दिली होती. परंतु, आईने फारसे लक्ष दिले नाही. त्यामुळे नराधम पित्याची हिंमत वाढली.
त्यानंतर १४ मे रोजी नराधम पित्याने तेच कृत्य केले. दुसऱ्या दिवशीही त्याने तेच कृत्य केले. त्यामुळे घाबरलेली मुलगी घराबाहेर पडली. शेजाऱ्यांच्या मदतीने ती आईच्या दुकानात गेली. त्यामुळे मुलीला घेऊन तिच्या आईने थेट पाचपावली पोलिस ठाणे गाठले आणि पोलिसात तक्रार केली. याप्रकरणी पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून नराधम पित्याला अटक केली. पोलिसांनी त्याला न्यायालयात हजर करून त्याची २० मे पर्यंत पोलिस कोठडी घेतली आहे. एकंदरीतच घडल्या प्रकारामुळे मुली स्वतःच्या घरातही कितपत सुरक्षित आहेत ? यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

# झारखंड : तीन वर्षाच्या मुलीवर सामुहीक बलात्कार करून मुंडकं छाटलं

# दलित मुलीची 1.5 लाखात विक्री, अन् तिच्यावर बलात्कार..

# दै. संध्यानद मधील माझे काही पत्र

## दंगलीतील पीडितेला अखेर न्याय मिळाला

महाशय,

गुजरात २००२ च्या दंगलीत सामूहिक बलात्कार झालेल्या बिल्कीस यांना तब्बल १७ वर्षांनंतर न्याय मिळाला. त्यांच्या एका मुलीचीही क्रूरपणे हत्या दंगलग्रस्तांनी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना ५० लाख नुकसानभरपाई, सरकारी नोकरी, आणि घर देण्याचे आदेश गुजरात सरकारला दिले. बिल्कीस यांनी मिळालेल्या रकमेतील मोठ्ठा हिस्सा पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी उपयोगात आणला जाईल, असं सांगितलं. इतका मोठा अन्याय, त्यातही सतरा वर्षे न्याय मिळण्यासाठी पाहावी लागणारी वाट, इतकं सर्व दुःख असतानाही मन मात्र किती मोठं ठेवलं. माझा हा लढा न्याय मिळवण्यासाठी होता, कोणाच्या विरोधात वैयक्तिक बदला घेण्यासाठी नाही. हेही त्यांनी आवर्जून सांगितलं.

**गणेश विमल महादू सानप,**

ganeshsanap1987@gmail.com

२ | सोमवार १९ नोव्हेंबर २०१८ | संध्यानंद

## शबरीमला मंदिराप्रमाणे बाकी मंदिरांत प्रवेश मिळेल का?

महाशय,

शबरीमला मंदिरात महिलांनाही प्रवेश मिळाला हे ऐकून बर वाटलं, पण एक गोष्ट खटकली ती अशी की आज आपण स्वतःला जरी प्रगत समजत असलो तरी, स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीत नक्कीच प्रगती झालेली नाही. विशेष म्हणजे मंदिरातील अधिकारी आणि एखाद्या राज्यातील सरकार जर अशा गोष्टींना पाठिंबा देत असतील तर ते नक्की थांबवले पाहिजे. मंदिर कोणतही असो, ते सार्वजनिक आहे म्हटल्यावर तेथे कुणीही जाऊ शकतं. जितका अधिकार पुरुषांना आहे तितका महिलांना असायलाच हवा, हा अधिकार घटनेतही आहे.

आणि केवळ महिलांना मासिक पाळी येण्यावरून प्रवेश नाकारला जातोय. तर पुरुष आजही, ही गोष्ट का समजून घेत नाही की मासिक पाळी ही नैसर्गिक क्रिया आहे. त्यात अस्पृश्य असं काय? यावरून एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, स्त्रीला आज ही तीचे स्वतःचे अधिकार मिळवण्यासाठी झटावंच लागतंय.

**गणेश विमल महादू सानप** ( ठाणे)

ganeshsanap1987gmail.com

२ | सोमवार
१० डिसेंबर २०१८

## हिंसाचार आजही तसाच आहे.....

**महाशय,**

जसे महिला दिनानिमित्त मोर्चे निघतात, काही चर्चासत्र होतात, परिसंवाद रंगतात तेच काहीसं आजही जागतिक पाहायला मिळतं. ही फक्त एक प्रक्रिया झाली आहे. निदान महिला दिन आणि हिंसाचार प्रतिबंधक दिन या दोन दिवशी तरी ती खरंच मुक्त आहे का? या दोन दिवशी तरी तिला तिच्या इच्छेने जगता येतंय का?

स्त्री आणि पुरुष हा केवळ निसर्गाने केलेला फरक आहे. पण त्याही पलीकडे जाऊन बघण्याची कुणाची इच्छा होत नाही की तीही माणूसच आहे. आजही ती स्वतःच वर्चस्व आणि आई-वडिलांची इज्जत जपण्यासाठी काही पुरुषांच्या राक्षसी वृत्तीला विरोध न करता मूग गिळून बसण्यातच शहाणपण मानते. हेच तर तिचं मोठेपण आहे, जे काही पुरुषांना वाटत की आपण तिच्यावर हात उचलला म्हणजे मर्द झालो.

स्त्री इतकी सहनशीलता पुरुषांमध्ये नक्कीच नाही. तिची व्यथा ही जन्मापासून सुरू होते भ्रूणहत्या, ती मुलगी म्हणून तिच्याकडे जाणीवपूर्वक केलेलं दुर्लक्ष, पुढे जाऊन बालविवाह, लैंगिक, शारीरिक, मानसिक, त्रास त्याही पुढे जाऊन संसार आलाच. त्यातही लग्न म्हणजे तिचा पुनर्जन्मच असतो कारण तिथून पुढे तिचं नवीन अस्तित्व तिला निर्माण करायचं असतं आणि अशा संसारातही मारहाण, हुंडाबळी, फसवणूक, लादलेली गर्भधारणा, कधी कधी तर तीच पाऊल आत्महत्येकडं वळतं, या सर्व समस्यांना तोंड देणं इतक सोप्पं नाही.

हिंसाचार हा थांबलाच पाहिजे आणि तिला तिचा मान मिळालाच पाहिजे. तिच्यासाठी आला तो दिवस सारखाच असतो. जर तिला एक माणूस म्हणून समजून घेतलं तर या दिवसाचं सार्थक होईल.

**गणेश विमल महादू सानप** (ठाणे)
मो. नं - ९५९४६०७३९२
ganeshsanap1987gmail.com

## महिलांनी न्यायाची अपेक्षा ठेवायची कुणाकडून?

**महाशय,**

मध्य प्रदेशचे पोलिस महानिरीक्षक त. घ. सिंग यांचं म्हणणं आहे की, मुली शाळेत जाऊ लागल्यामुळे अपहरणांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. समजा असं असेल तर मग तुम्ही कुठे कमी पडताय. ग्रामीण भागात बदल घडतोय मुलींना उच्च शिक्षणासाठी मार्ग मोकळे होत आहेत. अश्या परिस्थितीत हे विधान करून काय साध्य करायचं आहे? आज कुठलंही वर्तमानपत्र बघितलं तर एक दोन बातम्या बलात्कार, लैंगिक छळाशी संबंधित असतातच.

मध्यंतरी एका पोलीस उपनिरीक्षकाने तक्रारदार युवकाच्या पंचवीस वर्षीय बहिणीवर वाईट नजर ठेवून शारीरिक संबंधाची मागणी केल्याची बातमी वाचण्यात आली. वर्दीचा धाक दाखवून तिच्याकडून ही मागणी करण्यात आली. अशी नीच प्रवृत्तीची माणसं जर अशा पदावर कार्यरत असतील, तर जनतेने आणि विशेष करून महिलांनी अपेक्षा ठेवायच्या कुणाकडून?

**– गणेश विमल महादू सानप,**
ठाणे
ganeshsanap1987@gmail.com

# विनंती

- मुलगा किंवा मुलगी हि निसर्गाची देण आहे ते आपल्या हातात नाही मुलगा असो वा मुलगी आनंदाने स्वीकार करू.
- बर्फी ऐवजी पेढे वाटून सुरवातच समानतेतून करू.
- तिचाही माणूस म्हणून स्वीकार करू.
- वंशाला दिवा हवा म्हणून पहिला मुलगा असावा आणि त्यानंतर मुलगी झाली तरी चालेल या मानसिकतेत बदल करू.
- आणि समाजात घडणाऱ्या असुरक्षित घटना गप्प न बसता त्यावर आवाज उठवू.

**धन्यवाद,**

**गणेश विमल महादू सानप**

हे पुस्तक सर्वच आई-वडिलांना  समर्पित

# आभार

- माझे आई-बाबा (विमल-महादू रामभाऊ सानप)
- अँड. बी. आर. जी. फिल्मस (अँड बी.आर.गांडोळे)
- अभिषेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्था, अंधेरी (सुनीता नागरे)
- स्माईली फिल्म प्रोडक्शन (शरद राजभोज)
- ऍडव्हान्स इंजिनीरिंग कन्सल्टंट, ठाणे (श्रीधर नेवाळकर, डॉ.सुवर्णा नेवाळकर)

एकनाथ सायंकाळी शेतावरून घरी येतो अंगणात दोन वर्षाची मुलगी खेळत असते. एकनाथचे वडील जनावरांना चारा टाकत असतात आणि आई स्वयपांक करत असते.

**एकनाथ** :- बाई, (आईला बाई म्हणून हाक मारतो) सुमी कुढं गेली, तू सयपाकाला बसलीस. ती तर माह्या पुढं निघाली होती शेतावरून माझं थोडस काम आहे सांगून.

**बाई** :- ती झोपलीय पाय आतल्या खोलीत पोटात कळा मारत्याय म्हणे, काय माहित काय वाढून ठेवलय देवाने या बारीला.

**एकनाथ** :- म्हंजी

**बाई** :- म्हंजी, काय नई बाबा पहिली कार्टी झालीय याबारीला दिस गेले तर काय करायच.

**एकनाथ** :- गप ग बाई, तोहं आपलं काई बी सुरु होत लगेच.

(एकनाथ आतल्या खोलीत जातो)

**एकनाथ** :-  काय ग सुमे, मला म्हणे काम हाय घरी अन इथं येऊन पसरून घेतलय. बाई काय म्हणतीय पोटात कळा मारत्याय.

**सुमन** :- काय माहिती जड काई उचललं बी नई म्या तरी पोटात लै कळा मारून येत्याय.

**एकनाथ** :- बर बर अत्ताच्याला गोळी बिळी असलं एखादी घे उद्या इतकयात जाऊन येऊ दवाखान्यात.

आता उठ पुरीला भूक लागली असलं मला बी भूक लागलीय जेव अन घे लवकर झोपून.

एकनाथ आतल्या खोलीतून बाहेर पडतो.

**एकनाथ** :- बाई मी गाया पिळून घेतो (दूध काढून) तवर तू जेवायला घे.

**बाई** :- काय म्हणाली रे ती.

**एकनाथ** :- काय नई, जरासं पोटात दुखतंय उद्या घेऊन जातो तिला दवाखान्यात.

**बाई** :- दवाखान्यात जायची काई बी गरज नई. तिला दिस गेले असतील तो देवाऱ्यातला अंगारा घे अन लावायला सांग तिला या बारीला चांगला भगत बघते मी वंशाला दिवा पाहिजे बाबा एक तर तू एकुलता एक अन त्यात पण दोन्ही कार्ट्या म्हणल्यावर मग वंश पुढं जायचा कसा.

**एकनाथ** :- अरे बाई असं काही नहिये तिनी सकाळी शेतात जड पाट्या उचलल्या म्हणून  पोटात गाठ आलीय तिच्या.

**बाई** :- बघा बाबांनो तुम्ही लै शहाणे लोक मी काय बोलणारं.

**दादा** :- (एकनाथ चे वडील एकनाथ त्यांना दादा म्हणून हाक मारतो) ये हौसे त्यांचं त्यांना पाहूदे, आपली लाकडं जाऊन पडली आता म्हसनात. भूक लागलीय आवर लवकर.

**बाई** :- बरं बाई तुम्ही कधी बोलू दिल तवा आता बोलू देणारे मला.

दुसऱ्या दिवशी सकाळी दवाखान्यात सर्व चेकअप झाल्यानंतर

**डॉक्टर** :- एकनाथ, हे असं होतं या दिवसात काळजी घ्या अन जड काही उचलू देऊ नका आता सुमनला.

**एकनाथ** :- म्हन्जी.

**डॉक्टर** :- अहो तुम्ही बाबा होणार परत

**एकनाथ** :- खरं, काय बोलता. (सुमन कडे बघून)

**डॉक्टर** :- हो, हो खरंच. (सुमन कडे बघत) काळजी घे सुमन आता.

**सुमन** :- हो डॉक्टर.

दोघेही घरच्या दिशेने निघतात

**एकनाथ** :- काय ग सुमे आधी नाही का सांगायचं.

**सुमन** :- अहो मला बी आत्ताच कळलं.

**एकनाथ** :- जाऊदे, मला तर लई आनंद झाला बघ, ये पण या बारीला मुलगाच व्हावा.

**सुमन** :- ते काय आपल्या हातात असत व्हय होऊद्या काई बी काय फरक पडतो.

**एकनाथ** :- फरक का नाही पडत, या पोरींची लई डोकेदुखी असते बघ जन्माला आल्या पासून ते मरेपर्यंत आई बापाच्या जीवाला नुसता घोर, लग्न होई पर्यंत त्यांना जपा लग्नाच्या वेळी हुंडा भांडा द्या अन लग्न झाल्यानंतर तिच्या सासरच्या मागण्या पूर्ण करा.

**सुमन** :- असं काई नई ओ, दिवस बदललेत आता मुली शिकून शहरात कामाला लागल्या कि हुंडा पण द्यायची गरज नाही आता.

**एकनाथ** :- हो ग पण वंशाला दिवा हवा असं वाटत.

**सुमन** :- तुम्ही लै विचार करता बघू काय होतय पुढं. चला पटापटा इथून जाऊन शेतावर जायचंय माहितीये ना.

**एकनाथ** :- हो, हो मग.

दोघेही घरी पोहचतात.

**बाई** :- आले का? शे-दोनशे रुपय घालून, काय म्हणाला डॉक्टर.

**एकनाथ** :- अग तिला दिवस गेलेत.

**बाई** :- काय?, हि तर लई गॉड़ बातमी हाय, या खेपेला पोरगंच पाहिजे बघ.

**एकनाथ** :- हो, हो, होईल आवर.

**बाई** :- मी आत्ता पार्वतीला जाऊन इचारते तुम्हाला नातू झाला त्यावेळेला कोणता भगत बघितला होता.

**एकनाथ** :- (हसत) बाई तुपण्णा.

एकनाथ आणि सुमन शेतावर गेल्यावर बाई पार्वतीकडे सर्व विचारपूस करून घेते. संध्याकाळी दोघेही शेतावरून घरी आल्यावर आपापली कामे आटपून जेवायला बसतात. टीव्ही चालू असतो. तितक्यात बातमी येते दोन वर्षाच्या मुलीवर बलत्कार करून मुलीचा चाकूने गळा कापण्यात आला.

**बाई** :- आर देवा कुठं घडलर एक्या हे.

**एकनाथ** :- मुंबईची बातमी हाय ती.

**बाई** :- बघितल काय दिवसमान आलेत बाई ह्या कार्ट्या (मुली) सांभाळायच्या म्हणजे लै पाप असत बघ जीवाला. मला काय बी माहित नाही ते उद्या अंबर गावला भगताकडं जाऊन ये शेतावरची काम राहिली तर राहूदेत बाबा अन अंबर गावच्या थोडं पुढं गेलं कि एक डॉक्टर हाय थोडे पैशे घेऊन तो सांगतो बघ गर्भ मुलीचा हाय कि मुलाचा मी पार्वतीला समद विचारून आलेय उदया पुनव (पौर्णिमा) पण हाय दिवस पण चांगला हाय. भले दोन तीन जित्राबं (शेळी-गाई पैकी) इकायला लागले तरी चालेल.

**एकनाथ** :- बरं, बरं.

जेवण वैगेरे आवरून सर्व जण झोपायला जातात. सुमन आपली छताकडे एक टक बघत विचार करत पडलेली असते.

**एकनाथ** :- काय ग, काय इचार कर्तीस

**सुमन** :- काही नाहीव उद्या डाक्टर कड जायच म्हणताय जर मुलगीच असली मंगव.

**एकनाथ** :- तूबी लै इचार कर्तीस बघ, बघू उद्याच उद्या झोप आता.

**सुमन** :- काय ओ सांगाना पण, जर मुलगी असली तर नको का तुम्हाला पण.

**एकनाथ** :- जरा विचारात पडतो, तस काई नाही गं, `बाई' नाराज होईल अन परत तुलाच दोष देत बसलं

**सुमन** :- त्यांचं सोडा तुमचं सांगा मला.

**एकनाथ** :- मला अत्ता काहीच सुचत नाही बघ, तू झोप बर उद्याच उद्या बघू. (आणि कूस बदलून झोपून घेतो)

सुमनला काही झोप येत नव्हती ती आपली विचारतच पडलेली मी एक आई आहे मी तर असं काही होऊ देणार नाही. तितक्यात एकनाथ झोपेतच ओरडतो पाणी, पाणी.

गडगड पाणी पित. चिमणे (एकनाथची छोटी मुलगी), माझ्या लेकरा बाजूला सुमनच्या तोंडावर हात फिरवत बाबाला पाणी दिलस. सुमन एकनाथचा हात झटकत कायहो काय झालं. चिमणी तिकडं झोपलीय अत्त्यांपुढ.

**एकनाथ** :- खट्कन जागा होऊन डोळे चोळत, काहीं नाही गं मला जरा स्वप्न पडलं कि, मी चक्कर येऊन पडलो आणि चिमणीने येऊन मला पाणी पाजलं म्हणून.

**सुमन** :- बघितलना, देवानेही द्रुष्टांत दिला. देव पण सांगतोय मुलगा असो व मुलगी आईबापाला वेळेवर दोघही तितकेच कामाला येणार.

**एकनाथ** :- ये बाई, तुझं घोडं तिथंच अडलंय का अजून. झोप बरं.

सकाळी सर्व आवरून एकनाथ आणि सुमन अंबर गावला जाण्यासाठी निघाले. बसमध्ये...

**कंडक्टर** :- तिकीट, बोला तिकीट

**एकनाथ** :- मॅडम, दोन अंबर गांव द्या बरं.

(एकनाथच्या बाजूच्या सीटवर बसलेली म्हातारी मध्येच बोलून उठते.)

**म्हातारी** :- काय गं बाईमाणूस असून जमतका हे समदं करायला.

**कंडक्टर** :- (हसत) आजी बाई, आता बाईमाणूस रिक्षा चालवते, रेल्वे चालवते, विमान चालवते, देश चालवते, प्रशासन चालवते बाईमाणूस आता सगळीच काम करते.

**अज्जी** :- बरं बरं बाई, चांगल हाय आमच्या येळेला तर आमचं-आमचं चूल अन मुलंच होत बघ.

**सुमन** :- ऐकतायनाहो आता तस कायबी राहील नाही.

**एकनाथ** :- हो, हो ऐकतोय.

पुढच्या शीटवरील शिक्षिका मागे वळून पेपरमधील फोटो आजीला दाखवत.

**शिक्षिका** :- आजीबाई हे बघा हि आजची बातमी आहे. ज्या मुलीला पायात घालायला चप्पल नव्हती त्या मुलीने आज आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवल. आणि आपल्या देशाचे नाव मोठं केल. तिच्या वडिलांचं अस म्हणणं आहे कि माझं नाव मोठं केल माझ्या मुलीने याचा मला गर्व आहे आणि त्याही पेक्षा जास्त गर्व आहे कि मला एक नाही तर तीन-तीन मुली आहेत.

**आज्जी** :- हे अंतर्रर्र....

**शिक्षिका** :- आंतरराष्ट्रीय, म्हणजे, जगात.

**आज्जी** :- अरे बापरे, लै आनंदाची बातमी हाय ग. शेजारी एकनाथच्या मांडीवर बसलेल्या चिमणीच्या तोंडावरून हाथ फिरवत. ऐकलं काग नाव काय तुझं.

**एकनाथ** :- पल्लवी, पण आम्ही चिमणीचं म्हणतो तिला.

**आज्जी** :- अरे वा, ऐकलं का चिमणे, तू पण मोठं होऊन तुझ्या बापाचं नाव मोठं करायचं बरं का.

**सुमन** :- हो, हो, लै हुशार हाय ती.

**आज्जी** :- कुण्या गावाला उतरायचं तुम्हाला.

**सुमन** :- अंबर गावला.

**आज्जी** :- अरे हो का, मला बी तिकडंच उतरायचं माझं बी तेच गांव हाय.

**सुमन** :- नाही, आम्ही त्या गावचे नाहीत.

**आज्जी** :- बरं, बरं, भगताकडे चाललेत का मग.

**सुमन** :- हो पण, तुम्हाला कसं कळलं.

**आज्जी** :- तो लई परसिद् भगत हाय. लई लामण लोक येतात त्याच्याकडं. जास्तकरून तर मुलाबाळांवालेच असतात.

**सुमन** :- आम्ही पण त्यासाठीच चाललोय.

**आज्जी** :- बरं, बरं.

शिक्षिका हा सर्व संवाद ऐकते तिला एक गोष्ट खटकते कि, दोन-तीन वर्षांची मुलगी असताना हि लोक का बरं चालली असतील भगताकडे.

तितक्यात स्टॉप येतो एकनाथ-सुमन पाठोपाठ शिक्षिका त्याच गावात शिकवत असल्यामुळे तीही उतरते. आजीबाई एकनाथ आणि सुमनला रस्ता दाखून देते. भगतापर्यंत कसं जायचं. त्यानुसार एकनाथ आणि सुमन चिमणीला घेऊन रस्त्याला लागतात.

शिक्षिका मागून हाक देते.

**शिक्षिका** :- अहो ताई,

सुमन एकनाथ दोघेही मागे वळून बघतात.

**सुमन** :- मला हाक मारली!

शिक्षिका :- हो,हो.

सुमन :- काय ओ.

शिक्षिका :- राग नका येऊ देऊ ताई.

सुमन :- कशाचा राग?

शिक्षिका :- नाही मला एक विचारायचं होत.

सुमन :- ताई त्यात कसला राग तुम्ही कशा बद्दल बोलताय पण.

शिक्षिका :- (डायरेक्ट विषयावर येतात) ताई तुम्हाला दोन-तीन वर्षाची मुलगी असताना तुम्ही त्या भगताकडे का म्हणून चालल्या आहात.

सुमन :- सुमनचा चेहरा पडतो, एकनाथ कडे बघत त्याच काय आहेना ताई, मला पुन्हा दिवस गेलेत आणि आम्हाला पहिली मुलगी हाय, अत्ता याबरीला यांना अन माझ्या सासूबाईंना मुलगाच हवाय म्हणून आम्ही भगताकडे आलोय आणि इथून निघाल्यावर पुढच्या गावात एक डाक्टर आहे तो काहीतरी पैशे घेऊन सांगतो म्हणे की मुलगा आहे की मुलगी तिकडेही जायचं आहे.

शिक्षिका :- अरे रे कायरे तुम्ही लोकं. आणि मुलगी असली तर तुम्ही तिला या जगात येऊ देणार नाही तर. तुम्ही स्त्रीच आहात ना ताई.

एकनाथ आणि सुमन चा चेहरा पडतो दोघेही मान खाली घालतात.

माझ्या आई वडिलांना माझ्या भावाने घराबाहेर काढलं आज ते माझ्याकडे अगदी मजेत राहत आहे. मग त्या वेळी त्यांनीही असाच विचार केला असता तर आज कुठे असते ते कुणाचा आसरा घेतला असता. मला असं नाही म्हणायचं की सर्वच मुलं अशी असतात पण एकच सांगायचं आहे. मुलगा असो वा मुलगी दोघेही तुम्हाला जीव तर लावणारचना. आणि तुम्ही ज्या भगताकडे चालले आहात. तो तुम्हाला अंगारा-धुपारा देऊन ह्या गोष्टी साध्य करेल का? अहो भोंदू पणा असतो हा सर्व. तुमच्या सारखी लोकं त्यांच्या जाळयात फसता मग त्यांचं ही फावत.

मीही एक स्त्री आहे, ताई तुम्ही ही एक स्त्री आहात मग आपणच मुलगी नको म्हणायचं का?

**सुमन** :- माझं काई बी म्हणणं नईओ ताई, पण.....

**शिक्षिका** :- हो ते समजलं मला, एकनाथकडे बघत अहो दादा तुम्ही समजूतदार दिसता तुम्ही समजून घेऊन तुमच्या आईलाही समजावून सांगणं हे तुमचं कर्तव्य आहे.

**एकनाथ** :- हो, हो ताई पण.....

**शिक्षिका** :- पण काय, दादा.

**एकनाथ** :- अहो या रोज रोज अश्या घटना घडत असतात. हे ऐकून जीव कासावीस होतो बघा. कधी बलात्कार, कधी छेडछाड, कधी लहान मुलींना पळवून नेऊन विकणे, मुलींना तळ हाताच्या फोडावाणी संभाळायचं पुढे जाऊन तीच लग्न झालं की नवरा आणि सासरचे छळ करतील की काय हि भीती, दिवस भर शेतावर गेलं तरी भीती वाटते बघा दोन वर्षांची पोरगी घरी तिच्या बरोबर काही घडणार तर नाहीना कारणही तसंच आहे. अहो ज्या जीवाला शब्द उच्चारता येत नाहीत अशे जीव काही नराधमाच्या वासनेतून सुटत नाहीतओ. म्हणून असं वाटतं एक मुलगी बस झाली.

शिक्षिका :- अगदी बरोबर आहे तुमचं म्हणणं, पण मग त्यावर हाच एक उपाय आहे का दादा, की मुलगी होऊच द्यायची नाही. उलट आपण या विरुद्ध आवाज उठवायला हवा. समाजात कुठेही अशी घटना घडत असेल तर आपण सर्वांनी मिळून त्या विरुद्ध आवाज उठवायला हवा. अशी पळवाट काढून नाही जमणार.

**एकनाथ** :- तुमचं म्हणणं पटतंय ताई..

**शिक्षिका** :- बघा, मला शाळेला उशीर होतोय. आलेच आहात इतक दूर तर जाऊन या भगताकडे, पुढे डॉक्टर कडे जायच कि नाही हा तुमचा निर्णय. माझं कर्तव्य होत सांगायचं ते मी केलं. मला वाटत तुम्ही असं काहीही करू नये.

**सुमन** :- मी सांगते पुन्हा एकदा यांना समजावून.

**शिक्षिका** :- (बॅगमधून चॉकलेट काढत चिमणीला देते. चिमणीच्या तोंडावरून हात फिरवत) एक पा देते बेटा.

चिमणी चॉकलेट घेऊन तोंड फिरवते.

**शिक्षिका** :- बरं, बरं, नको देऊस बाय तर करशील.

**सुमन** :- ये चिमणे, टाटा कर बाई मावशीला.

आणि शिक्षिका निघुन जाते.

**एकनाथ** :- ये सुमे, मला तर काहीच सुचत नाही बघ. जायच का माघारी. मी बाईला सांगतो काय सांगायचं ते.

**सुमन** :- आता आलोय तर जाऊन येऊ नाहीतर आत्या लई भडकतील, मग जाताना ठरवू काय सांगायचं ते.

**एकनाथ** :- बरं चल.

दोघेही भगताकडे पोहचतात तिथे बरीच गर्दी असते भगत आपला एक-एकाला मार्ग (उपचार) सांगत असतो. यांचा नंबर येतो हे दोघेही दर्शन वगैरे घेऊन पुन्हा घरच्या दिशेने निघतात. रस्त्याने चालता-चालता.....

**सुमन** :- पाहिलं का तुम्ही.

**एकनाथ** :- काय ते.

**सुमन** :- किती गर्दी होती ते अन त्यातले बरेच जण तर मुलांसाठीच आलेले होते.

**एकनाथ** :- माझं नव्हतं लक्ष.

**सुमन** :- मग तुमचं लक्ष कुठं होत?

**एकनाथ** :- सुमे, मलाबी वाटतं ग व्हायचं ते होउदे, मुलगा असो नाई तर मुलगी काही फरक नाही पडत.

**सुमन** :- मग मी काय सांगत होते आधीपासून.

**एकनाथ** :- जाऊदे आपण डाक्टरकडं नई जायचं आता, सरळ घरला जाऊ.

**सुमन** :- अहो , पण आत्याला काय सांगायचं.

**एकनाथ** :- सांगू डाक्टरकडं जाऊन आलो अन त्यानंबी सांगितलं मुलगाच हाय म्हणून.

**सुमन** :- खोटं बोलायचं.

**एकनाथ** :- भडकून, मग चल जाऊ डाक्टरकडं.

**सुमन** :- अहो तुम्ही भडकू नका बर.

**एकनाथ** :- अरे मग असं पण नको तसं पन नको मग काय करायच एक तर आधीच डोकं भणभण करतंय माझं.

**सुमन** :- बरं बरं, भडकू नका जाऊ घरीच निघुन आपण.

संध्याकाळी दोघेही घरी पोहचतात, आपापली कामे आवरून सर्व जण जेवायला बसतात.

**बाई** :- कायर, आल्यापासून दोघही शांत शांत.

**एकनाथ** :- तसं काई नई दमलोय खूप म्हणून.....

**बाई** : - काय म्हणला मग डाक्टर.

**एकनाथ** :- काय नई समद व्यवस्थित हाय म्हणाला.

**बाई** :- म्हंजी मुलगाच हाय चेक केल का चांगलं.

**एकनाथ** :- हो, हो.

**बाई** :- चला जीवात जीव आला एकदाचा, अन भगत काय म्हणला.

**एकनाथ** :- काय नई, सुमनकडे बघत.

**बाई** :- आर त्या दगड्याच्या पोरीचं पाहिलं का काय झालं. नवऱ्यानं टाकून दिल बिचाऱ्या दगड्याला मुलगा नाही एकुलती एक पोरगी अन अशी टाकून दिली किती त्या बिचाऱ्याच्या जीवाला घोर झालाय. आता आयुष्यभर अंगावर पोसायच. त्याची बायको दुपारी लई रडत होती मापशी. म्हणे बाई आमचा जीव

नसल्यावर कस होणार माझ्या लेकीच या विचारानेच जीव तुटतोय बघ. एखादा आजार परवडला पण हा लई घोर असतो बघ.

**एकनाथ** :- (जेवत्या ताटात हात धुवत) बाई, तूबी बाई माणूसच हाय ना, मग का असं माग लागलीय तूच असा विचार करायला लागली तर कस व्हायचं. (एकनाथ रागारागातच निघून जातो.)

**दादा** :- ये हौसे, लई थोभाड चालत बघ तुझं, लेकरं थकून भागून आलेत जेऊ द्यायच दोन घास सुखानी त्यांना तर, तो आपलं झालं चालू लगेच.

**बाई** :- काळजी पोटी बोलतेओ, तो काय दुस्मन हाय का माझा.

**दादा** :- अगं पण त्यांचं ते बघतील तुझ्या तोंडाला टाळा लावणा जरा.

**बाई** :- बरं बाई चूक झाली माझी.

आज सुमनला हॉस्पिटल मध्ये आणलं होत. एकनाथ चिमणीला घेऊन बाहेर वॉर्ड मध्ये बसला होता. बाई त्याच्या समोरच्या बाकावर बसलेली.  तितक्यात सिस्टर बाहेर येऊन.

**सिस्टर** :- इथे `एकनाथ -----' कोण.

**एकनाथ** :- हो, हो,  मॅडम मीच एकनाथ. (जरा घाबरूनच उठतो)

**सिस्टर** :- काही नाही तुमचं पेशंट आत घेतलंय, इथे ह्या फॉर्मवर दोन सह्या करायच्या आहेत तुम्हाला. आणि अजून कोण आहे तुमच्या सोबत.

**एकनाथ** :- कोण नाही माझी आई अन मीच हाय. सुमनची आई येईलच थोड्या वेळात मी कळवलंय त्यांना.

**सिस्टर** :- काही नाही, बाई माणूस आहे कि नाही सोबत म्हणून विचारलं.

**एकनाथ** :- आहे ना.

मध्यंतरीच्या अनेक घटनांवरून एकनाथची मनस्थिती बदलली होती. त्यानेही मनात ठरवलं होत कि मुलगा असो वा मुलगी तितक्याच आनंदाने स्वीकार करायचा.

तितक्यात समोरून येत असलेल्या माणसाचे फोन वरील संभाषण एकनाथ च्या कानावर पडतं.

`हॅलो' अरे, काय सांगू बाबा पेढ्याची अपेक्षा होती, पण कसलं काय शेवटी नशिबात बर्फीच होती.

एकनाथला हे शब्द खटकतात, म्हणजे सुरुवात इथनंच (पेढे-बर्फी) होते तर.

तितक्यात सिस्टर बाळ घेऊन बाहेर येते मागोमाग डॉक्टर हि असतात.

**सिस्टर** :- एकनाथ अभिनंदन मुलगा झाला तुम्हाला.

(बाई एकदम आनंदाने बाळाला घ्यायला धाव घेते.) `ये देवा' तू एकलच शेवटी माझं, तुझा नवस मी उद्याच पूर्ण करेल बघ.

एकनाथला सुचतच नव्हतं तो आपला मागेच उभा होता.

**डॉक्टर** :- एकनाथराव, काय हो आनंद नाही झाला तुम्हाला.

**बाई** :- का नाय व्हायचा आनंद, काय ते नाही केल आम्ही मुलगा होण्यासाठी, नवस केले, भगत केले, डाक्टर केले मग आनंद तर होणारच.

**डॉक्टर** :- म्हणजे.....

**बाई** :- अहो डाक्टर, आम्हासनी पहिली मुलगी हाय. म्हणून याबारीला वंशाला दिवा हवा होतो.

डॉक्टर दोन मिनटं विचारात पडते. अन रागातच `अहो आजीबाई' तुमचा वंशाचा दिवा जिने नऊ महिने पोटात वाढवला ती हि एक मुलगीच आहे ना?, तुमच्या वंशाच्या दिव्याला सुखरूप तुमच्या हातात ठेवलं ती डॉक्टर म्हणजे मीही एक मुलगीच आहेना?, आणि आता ज्याच्या हातात वंशाचा दिवा आहे म्हणजे तुम्ही एक मुलगीच आहात ना?

हा जर वंशाचा दिवा आहे तर याची आई कोण?, मी कोण?, तुम्ही कोण.

बाईचा चेहरा एकदम शांत पडला, कुठलीच प्रतिक्रिया चेहऱ्यावर नव्हती.

एकनाथ राव, तुम्हालाही असच वाटतं का?

अहो तुमच्या सारख्या तरुणांनी स्त्री-पुरुष समानतेचं महत्व आपल्या अशिक्षित आई-वडिलांना विश्वासात घेऊन पटवून द्यायला हवं. प्रत्येक जण असा विचार करायला लागला तर बदल घडणार कधी?

मला तर खूप कीव येते तुमच्या सारख्या माणसांची.

डॉक्टर रागातच तिथून निघून जातात.

वॉर्ड मध्ये भयान शांतता सर्वच जण अश्या अवस्थेत असतो कि डॉक्टर इथे उपस्थित सर्वांवर रागवली आहे.

एकनाथला स्वतःचा खूप राग आला होता. मला समजायला उशीर लागला. पण इथून पुढे स्त्री-पुरुष समानतेसाठीच आयुष्य घालवणार.

**समाप्त**

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. गणेस सानप यांचं ई साहित्यवरचं हे दुसरं पुस्तक.**

गणेशजी एक तरूण लेखक आहेत. शेतकऱ्यांची दुःखं, महिलांवरील अत्याचार आणि एकूणच समाजात असलेल्या अनिष्ट गोष्टींकडे ते जागृतपणे पहातात व इतरांचे त्याकडे लक्ष वेधून घेतात. त्यांना सामाजिक तळमळ आहे आणि त्या तळमळीतून त्यांचं लेखन होतं. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान